जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२७/०७/२०२३
## दि.२६/०७/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

**१**

**पो.स्टे.गुरनं./कलम** भारती विद्यापीठ पो स्टे ४९४/२०२३,भादविक ३९२,३२३,५०४,५०६,३४
**फिर्यादी** एक नागरीक,वय ३० वर्षे,रा.आंबेगाव-बुद्रुक,पुणे
**आरोपीत** रिक्षा चालक व त्याचे दोन साथीदार (अटक नाही)
**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दिनांक २०/०७/२०२३ रोजी रात्रौ १२/१५ वा.ते १२/३० वा.कात्रज चौक,जे.एस.पी.एम.समोरील बस स्टॉप ते हायवेवरील राजवीर प्युअर व्हेज या हॉटेलचे दरम्यान
**तपशिल** यातील फिर्यादी हे रिक्षाने आंबेगाव-बुद्रुक,पुणे येथे त्यांचे राहते घरी जात असताना,रिक्षा मध्ये फिर्यादी यांचे शेजारी बसलेल्या दोन इसमांनी फिर्यादी यांना हाताने मारहाण करुन,त्यांचे गळयातील सोन्याची चेन, हातातील अंगठी,खिशातील रोख रक्कम,तसेच रिक्षा चालकाने फिर्यादी यांचेकडील लॅपटॉप,चार्जर,माऊस असलेली बॅग असा एकुण १,६८,३४०/- रुपये किचा ऐवज जबरी चोरी करुन,रिक्षा मधुन हायवेवरील राजवीर प्युअर व्हेज या हॉटेल समोरील रोडवर ढकलुन देवुन पळुन गेले आहे.
**त.अंमलदार** सहाय्यक पोलीस निरीक्षक, वैभव गायकवाड ९९२१०९००४४

**२**

**पो.स्टे.गुरनं./कलम** कोथरूड पो स्टे १८३/२०२३,भादविक ३८०
**फिर्यादी** विजय ढोंबरे,वय-४२ वर्षे,रा.कोथरुड,पुणे
**आरोपीत** अज्ञात
**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२४/०७/२०२३ रोजी दुपारी ११/३० वा.ते दुपारी १५/०० वा.चे दरम्यान "संघर्ष मित्र मंडळ,गणेश मंदिर" जय भवानीनगर"सुर्य मुखी मारुती देवस्थान"जयभवानीनगर,कोथरुड,पुणे व दुर्गामाता मंदिर,पौड फाटा, केळेवाडी,कोथरुड,पुणे येथे
**तपशिल** यातील फिर्यादी यांचे "संघर्ष मित्र मंडळ,गणेश मंदिर" येथील गणेश मंदिराचे तसेच "सुर्य मुखी मारुती देवस्थान"जयभवानीनगर,कोथरुड,पुणे व दुर्गामाता मंदिर,पौड फाटा,केळेवाडी,कोथरुड,पुणे येथील उघडया असलेल्या मंदिरांचे दरवाजावाटे आंत प्रवेश करून,मंदिरातील एकुण १,९२०/- रु किंची पितळी व तांब्याचे धातुचे वस्तु चोरी करून नेले आहेत.
**त.अंमलदार** पोलीस अंमलदार, विशाल चौगुले ९८७००८८५७१

**३**

**पो.स्टे.गुरनं./कलम** वारजे पो स्टे ३२४/२०२३,भादविक ३०४(अ)
**फिर्यादी** गौरी राजगुरु, महिला पोलीस अंमलदार, वारजे माळवाडी पोलीस स्टेशन,पुणे शहर
**आरोपीत** १.कन्स्ट्रक्शनचे मालक २.सेंट्रींग ठेकेदार (अटक नाही)
**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२५/०७/२०२३ रोजी १७/३० वा.सर्वे नं.४१/१,येथील कन्स्ट्रक्शन साईटवर,वारजे,पुणे येथे

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील नमुद १.कन्स्ट्रक्शनचे मालक २.सेंट्रींग ठेकेदार यांनी त्यांचे सर्वे नं.४१/१,येथील कन्स्ट्रक्शन साईटवर,वारजे,पुणे याठिकाणी चार मजली इमारतीचे बांधकाम चालु असलेल्या साईटवरील, मजुर कामगारांकडुन काम करवुन घेत असताना,कामगारांचे जिवीताचे व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन त्यांना हेल्मेट,सुरक्षित जाळी,सेफ्टी बेल्ट इत्यादी योग्य ती साधनसामुग्री पुरविणे आवश्यक असताना,त्यांना तशी कोणतीही सुरक्षित साधने न पुरविता,तसेच उघडया डक्टवर योग्य ती साधन ठेवण्याची सोय न करता, हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्यामुळे,यातील कामगार अखिलेश देवता कुमार,वय-२०वर्षे,रा.सर्वे नंबर ४१/१,गुलाब मुलाणी यांचे कन्स्ट्रक्शन साईट,वारजे,पुणे हा तिस-या मजल्यावर सेंट्रींगचे कामा करीता लागणारी हातोडी घेण्याकरीता वाकला असता,तो इमारतीचे तिस-या मजल्यावरून खाली पडुन,त्याचे डोक्यास गंभीर दुखापत होवुन,तो मयत झाला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. रमेश बाबर ८५६९७४५६२९ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**